संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सरकारी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा पवित्रा

कोणत्याही राज्याचे प्रशासन हे तिथल्या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर किंवा सहभागावर अवलंबून असते. कर्मचारी आणि राज्यकर्ते यांच्यामध्ये जर योग्य समन्वय असेल तर अनेक गोष्टी व्यवस्थितपणे होऊ शकतात. हा समन्वय योग्य कामे योग्यवेळी पूर्ण करणे, नियमबाह्य कामांना कर्मचाऱ्यांनी नकार देणे आणि शासनाचा अवास्तव खर्च वाचवणे अशासाठी उपयुक्त ठरू शकतो. कर्मचारी म्हणजे केवळ सरकारी नोकर आहेत. त्यांनी फक्त राज्यकर्त्यांनी सांगितलेली कामे पूर्ण करायची. असा साधारणपणे अर्थ काढला जातो. परंतु, भारतीय घटनेच्या चौकटीमध्ये कार्यपालिकेला एक स्वतंत्र अस्तित्व दिले गेले आहे. त्यात साध्या कर्मचाऱ्यांपासून ते आयएएस अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या कामाचे महत्त्व विषद केले गेले आहे. यासाठीच कर्मचारी हा प्रशासनव्यवस्थेतला एक महत्वाचा घटक ठरतो. त्याच्याकडून कामे करून घेत असताना त्याच्या जर काही अपेक्षा असतील, काही सूचना असतील तर त्याचादेखील विचार झाला पाहिजे. तो ज्यावेळेला होत नाही त्यावेळेला सरकारी कर्मचाऱ्यांना आंदोलनाचे रणशिंग फुंकावे लागते. दुर्दैवाने आपल्या देशात आंदोलने केल्याशिवाय सरकारला जाग येत नाही आणि एखाद्या चांगल्या गोष्टीचे महत्त्वही पटत नाही. अशाच काही चांगल्या सूचनांसाठी महाराष्ट्रातल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना बेमुदत संपाचा इशारा द्यावा लागला आहे. १३ फेब्रुवारीपर्यंत सरकारने जर त्यांच्या मागण्या आणि सूचनांबाबत योग्य तो निर्णय घेतला नाही तर त्यांनी हा बेमुदत संपाचा निर्वाणीचा इशारा दिला आहे. सरकार कर्मचाऱ्यांबाबत संवेदनशील असेल तर पुढच्या दहा-पंधरा दिवसात त्यांच्या मागण्यांबाबत किंवा सूचनांबाबत चर्चा होऊ शकते त्यातून मार्ग निघू शकतो. आणि संप टाळला जाऊ शकतो. हा संप टाळण्यासारखीच कारणे आणि परिस्थिती दिसून येते. कारण या कर्मचाऱ्यांनी कोणत्याही फार मोठ्या आर्थिक लाभासाठी संपाचा इशारा दिलेला नाही. त्यात मग कंत्राटी पध्दतीवर घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याची मागणी केली गेली असेल, तर त्यात काही चूक ठरत नाही. कारण अक्षरश: दहा दहा वर्षे कंत्राटी पध्दतीने काम करून घेतले जाते आणि त्या कर्मचाऱ्याला आपण आज ना उद्या कायम होऊ किंवा, सेवेमध्ये आपल्याला सामावून घेतले जाईल अशी आशा वाटत असते. ही मागणी जशी न्याय्य ठरते तशीच कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने आणि प्रशासनाचा गाडा व्यवस्थितपणे चालावा, या उद्देशाने त्यांनी पाच दिवसांचा आठवडा करण्याची मागणी केली आहे. हा मुद्दा कदाचित वादाचा ठरू शकतो. कारण आठवड्याला दोन दिवस सुट्टी घेतली तर त्याचा निश्चितच कामाच्या गतीवर परिणाम होईल. आधीच दिरंगाईचा शाप असलेल्या सरकारी कामांमध्ये दर आठवड्याला दोन दिवस सुट्टी घेतली तर ही कामे आणखीनच रेंगाळण्याची शक्यता आहे.

## शासन प्रशासनातील विसंवाद

सरकारी कर्मचारी संघटनेने निवृत्तीचे वय साठ करावे अशी मागणी केली आहे. त्याचा निश्चितच विचार करता येऊ शकतो. त्यात सरकारचाही आर्थिक फायदा होण्याची शक्यता आहे आणि या कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा लाभ घेऊन सरकारी कामात सुधारणा करता येऊ शकते. परंतु आज प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणावर संगणक प्रणाली वापरली जाते. त्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग अपेक्षित आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देऊन त्यांचा निश्चितच उपयोग करता येऊ शकतो. तसे पाहिले तर या मागण्या गेल्या किमान दहा वर्षांपासून केल्या जात आहेत. परंतु त्याबद्दल सरकार निश्चित भूमिका घेऊ शकलेले नाही. आजकाल कर्मचाऱ्यांचे पगार बऱ्यापैकी असल्यामुळे पगारवाढीसाठी त्यांना आंदोलन करण्याची वेळ येत नाही. याचा अर्थ अन्य तक्रारींबाबतही सरकारी कर्मचारी सहनशील राहतील, असा राज्यकर्त्यांचा समज झालेला दिसतो. खरे तर राज्याचे प्रशासन गतिमान आणि पारदर्शक व्हायचे असेल तर मुख्यमंत्र्यांनी वर्षातून एकदा कर्मचारी संघटनांशी संवाद साधला पाहिजे. केवळ त्यांच्या तक्रारीच नव्हे तर सूचनांचासुध्दा स्वीकार केला पाहिजे. परंतु आमचे मुख्यमंत्रीच काय परंतु मंत्रीसुध्दा इतके मग्न असतात की, त्यांना कर्मचाऱ्यांच्या या सूचनांकडेसुध्दा लक्ष द्यायला वेळ नसतो. अर्थातच त्यांची ही कार्यमग्नता वाटते तितकी खरी नसते. उलट वेळेचे नियोजन करून राज्याशी संबंधित सर्व प्रश्नांना न्याय ज्याला देता येतो, तोच मंत्री खऱ्या अर्थाने कार्यमग्न किंवा बिझी असतो. कर्मचाऱ्यांना किंमत न देण्याची राज्यकर्त्यांची भूमिका खूप जुनी आहे आणि मग त्यातूनच शासन आणि प्रशासन यामध्ये विसंवाद निर्माण होतो. याचा परिणाम कामाच्या गतीवर होत असतो. आज संपूर्ण राज्यामध्ये दहा लाखांपेक्षा जास्त सरकारी कर्मचारी आहेत या एवढ्या मोठ्या मनुष्यबळाचा तितक्याच कल्पकतेने उपयोग झाला पाहिजे. ती दृष्टी नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये कुठे ना कुठे असंतोष खदखदत राहिला आहे.

## पैसे वाचविण्याची सूचना

सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरकारच्या या विसंवादी भूमिकेमुळे कर्मचारी संघटनांच्या सकारात्मक सूचनांकडेही दुर्लक्ष होते. ज्याप्रमाणे १३ फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देताना अशीच एक विधायक सूचना कर्मचारी संघटनेने केली. त्यात राज्याच्या करवसुली किंवा करप्रणालीमध्ये सुसूत्रता आणावी तसे केले तर राज्याच्या तिजोरीमध्ये पंचवीस हजार कोटींचे ज्यादा उत्पन्न मिळू शकेल. असा विचार त्यातून मांडला गेला. कर्मचारी संघटनेच्या दृष्टीने अशा प्रकारचा विचार मांडला जाणे ही फार मोठी गोष्ट ठरते. साधारणपणे आपल्या आर्थिक मागण्यांसाठी संप किंवा आंदोलने होतात. पण इथे सरकारचे उत्पन्न वाढवण्याची विधायक मागणी करून कर्मचारी संघटनांनी अत्यंत चांगले उदाहरण घालून दिले. किंबहुना एक जबाबदार संघटना म्हणून आपले महत्त्वही लक्षात आणून दिले. कर्मचारी स्वत: पुढाकार घेऊन राज्याच्या हिताचा जर अशा पध्दतीने विचार मांडत असतील, सरकारपुढे तसा प्रस्ताव मांडत असतील तर त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांबरोबर बैठक झाली त्यांनी हा विषय मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालू अशा प्रकारचे आश्वासन दिले. मात्र अद्यापपर्यंत या गोष्टी मुख्यमंत्र्यांपर्यंत गेलेल्याच नाहीत. अशा या दुर्लक्ष करण्याच्या भूमिकेमुळेच कदाचित सरकारी कर्मचाऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असला पाहिजे. अजून वेळ गेलेली नाही. सरकारने जागे व्हायला हरकत नाही.